नि. फौ. ख. क्र.५८/२०२१ निशाणी ६९

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ५ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – राहुल रमेश भगत

वय – ४५ वर्षे, व्यवसाय – सोनार

पत्ता – शिवाजी नगर, अकोला, ता.जि. अकोला.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्री.के.एस.ताकवाले यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. माझे ज्वेलरीचे दुकान असुन त्याचे नाव भगत ज्वेलर्स, सराफा बाजार, अकोला येथे आहे. मी आरोपी राष्ट्रपाल शिरसाटला ओळखतो. दि. २५.१०.२०२० रोजी आरोपी राष्ट्रपाल शिरसाट सोने मोडण्याकरीता माझ्याकडे आला व म्हणाला की, माझी आई आयकॉन हॉस्पीटलमध्ये भरती असुन त्याला उपचारासाठी पैशांची अत्यंत आवश्यकता आहे. आरोपीकडे १०० ग्रॅम इतके सोने होते. मी आरोपीला सदर सोने मोडुन त्याचे पैसे दिले. दि. ०४.१२.२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखा, अकोला येथील पोलीस आले व त्यांनी मला सांगितले की, सदरचे सोने चोरीचे आहे. मी त्या सोन्याची लगड केली होती. पोलीसांनी सदर सोन्याची लगड पंचां समक्ष माझ्याकडुन जप्त केली. पोलीसांनी जप्ती पंचनामा करुन माझ्या व पंचांच्या सहया घेतल्या. मला सदरचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ७०** देण्यात येते. आरोपी राष्ट्रपाल शिरसाट आजरोजी न्यायालयात हजर आहे. मला जप्त केलेली सोन्याची लगड दाखविल्यास मी ओळखु शकतो.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपी क्र. १ तर्फे विधीज्ञ श्री. ए.जी.अवातिरक यांचे मार्फत**

प्रश्न – कोणतीही व्यक्ती तुमच्याकडे सोने मोडण्यासाठी येते, तेव्हा त्याची मालकी तपासावी लागते का ?

उत्तर – होय, आम्ही सोन्याची मालकी तपासतो, परंतु ज्या व्यक्तीकडे सोन्याची पावती नसेल आणि वस्तु जुनी असेल त्यावेळी त्याचे सोन्याची मालकी न तपासता घेतो.

प्रश्न – तुम्ही मोड घेतांना ओळखीच्या इसमाकडुन पावती न घेता मोड घेता की अनोळखीं इसमाकडुन घेता ?

उत्तर – अनोळखी इसमाकडुनही पावती नसल्यावर मोड घेतो.

२. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र. २ तर्फे विधीज्ञ श्री. खंडारे गैरहजर, आरोपी क्र. २ हजर. आरोपी क्र. २ यास विचारले असता त्याने उलटतपास घेण्यास नकार दिला.</u>**

**<u>उलटतपास आरोपी क्र. ३ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.सुरवाडे यांचे मार्फत</u>**

३. आरोपी क्र. १ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास आरोपी क्र. ३ तर्फे विधिज्ञ श्री. एस.एस.सुरवाडे यांनी स्विकृत केला.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.12.19 17:47:11 +0530

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.

बाळापूर.
दि. १९/१२/२०२५